# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

## प्रारुप  महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (शुल्क व आकार) विनियम, २०१७

**विद्युत अधिनियम, २००३**

क्र. मविनिआ/लिगल/--------------- विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम ८६ च्या उप-कलम (१) च्या खंड (जी) सह कलम १८१ अन्वये  प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, याद्वारे खालील विनियम करीत आहे. हे विनियम, "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (शुल्क व आकार) विनियम, २००४" ला अधिक्रमित करतील.

**१ संक्षिप्त नांव,  प्रारंभ आणि व्याप्ती**

१.१ या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (शुल्क व आकार) विनियम, २०१७" असे म्हणावे.

१.२ हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापसून अंमलात येतील.

**२ व्याख्या**

२.१ या विनियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर -

(अ) **"अधिनियम"** म्हणजे वेळोवेळी सुधारणा केलेला विद्युत अधिनियम, २००३  (२००३ चा ३६);

(ब) **"आयोग"** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

(क) **"ग्राहक प्रतिनिधी"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ९४ च्या उप-कलम (३) नुसार ग्राहकांच्या हितांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आयोगाकडून प्राधिकृत **करण्यात येईल** अशी  व्यक्ती;

(ड) **"लघु वितरण परवानाधारक "** म्हणजे असा वितरण परवानाधारक ज्याच्या वीज दर निश्चितीकरणासाठीच्या त्याच्या अर्जात, पहिल्या वर्षाकरिता विजेच्या ५०० दशलक्ष युनिट्स पर्यंतच्या विक्रीपासून मिळणारी अंदाजित एकूण महसुली गरज, दाखविलेली असते;

२.२ (अ) येथे वापरलेले आणि व्याख्या न केलेले शब्द किंवा शब्दप्रयोग यांना अधिनियमात किंवा त्या अंतर्गत करण्यात आलेल्या नियमात किंवा विनियमात दिल्यानुसार अर्थ राहील.

(ब) या विनियमांच्या मराठी अनुवादात इंग्रजी विनियमांमधील कोणत्याही शब्दांचा/मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्‌भवल्यास आणि/किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील विनियम ग्राह्य धरण्यात येतील.

## ३. अर्ज किंवा याचिकांसाठी शुल्क

३.१ आयोगाकडे करण्यात येणा-या प्रत्येक अर्जासोबत या विनियमांच्या अनुसूचीमध्ये विर्निदिष्ट करण्यात आलेले शुल्क किंवा आकार पाठविण्यात येतील.

३.२ या विनियमांतर्गत अदा करावयाचे शुल्क किंवा आकार हे, **“**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**”** च्या नांवाने काढलेल्या, मुंबई येथे अदा करण्यात यावयाच्या, धनाकर्षाने (बॅन्क ड्राफ्टने) किंवा प्रदानादेशाने (पे-ऑर्डरने); किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून आरटीजीएस ने (रिअल टाइम ग्रॉस सेटलमेंट) किंवा एनइएफटी ने (नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड्स ट्रान्सफर); अथवा दोन हजार रुपयांपेक्षा जास्त नसलेली रक्कम रोखीने, भरणा करण्यात येईल.

३.३ या विनियमांतर्गत आयोगात प्राप्त झालेले शुल्क आणि आकार हे, आयोगाच्या निर्देशित बॅंक खात्यात जमा करण्यात येतील.

३.४ अधिनियमाच्या कलम १४२ आणि कलम १४६ अंतर्गत आयोगाने किंवा कलम १४३ खाली अभिनिर्णेता अधिका-याने **आकारलेला** कोणताही दंड, सद्र आदेशाच्या **दिनांकापासून** तीस दिवसांच्या आंत, किवा आयोगाने किंवा अभिनिर्णेता अधिका-याने, **मान्यता** दिलेल्या वाढीव मुदतीत **भरणा** करण्यात येईल.

३.५ या विनियमात विनियम ३.२ आणि ३.३ मध्ये **नमूद** करण्यात आलेल्या पद्धतीप्रमाणेच, दंडाची रक्कम देय राहील व जमा करण्यात येईल.

३.६ संबधित वरिष्ठ न्यायालयाने किवा न्यायाधिकरणाने निकाल दिल्यानंतर अर्जदाराला आयोगाकडे याचिका दाखल करण्याची मुभा देऊन निकाली काढलेल्या प्रकरणात नवीन अर्जाकरिता कोणतेही शुल्क भरावे लागणार नाही.

## ४. वीज दरामध्ये समावेश करणे

या विनियमांतर्गत अदा केलेले शुल्क किंवा आकार वीज दराच्या **निश्चितीकरणांतर्गत** खर्च म्हणून समाविष्ट करण्यास परवानाधारकास किंवा **निर्मिती कंपनीस** हक्क राहील.

परंतु असे की, अधिनियमाच्या तरतुदीतंर्गत किंवा आयोगाच्या आदेशानुसार **भरणा** केलेला दंड, वीज दराच्या **निश्चितीकरणांतर्गत** खर्च म्हणून **दाखविण्यास मान्यता देण्यात ये**णार नाही.

**५. सुधारणा करण्याचे अधिकार**

आयोग, कोणत्याही वेळी, या विनियमांतील कोणत्याही तरतूदीमध्ये बदल, फेरफार, फेरबदल किंवा सुधारणा करु शकेल.

**६. अडचणी दूर करण्याचे अधिकार**

या विनियमांतील कोणत्याही तरतूदीची अंमलबजावणी करताना जर काही अडचणी आल्या तर आयोग, साधारण किंवा विशेष आदेशाने, अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक असेल अशी, अधिनियमांतील तरतुदींशी विसंगत नसणारी, तरतूद करु शकेल.

# शुल्क व आकारांची अनुसूची

| अ. क्र<br>(१). | तपशील<br>(२) | शुल्क (रुपये)<br>(३) |
|---|---|---|
| १ | अधिनियमातील तरतुदींतर्गत वादावरील अभिनिर्णयासाठी करण्यात आलेला अर्ज | |
| | (एक) खाली (दोन) मध्ये उल्लेखलेल्या निर्मिती कंपनी व्यतिरिक्त, परवानाधारक किंवा निर्मिती कंपनीने केलेला अर्ज | पारंपारिक इंधनावर आधारित (कोळसा, गॅस, ऑईल,इ.) निर्मिती प्रकल्प, जल विद्युत प्रकल्प (२५ मेवॉ वरील ) आणि परवानाधारकः रु. ३,००,०००/-<br>आणि<br>अ-पारंपारिक किंवा नूतनशील ऊर्जा प्रकल्प, सह निर्मिती प्रकल्पांसह,: रु. ५०,०००/- |
| | (दोन) स्व-वापरासाठी चा निर्मिती प्रकल्प मालकीचा असलेल्या व्यक्तीने केलेला अर्ज | रुः २५,०००/- |
| | (तीन) ग्राहक किंवा ग्राहक प्रतिनिधीने केलेला अर्ज | रुः ५,०००/- |
| २ | अधिनियमाच्या कलम १५ अंतर्गत परवाना मंजूरीसाठी केलेला अर्ज | महाराष्ट्र शासनाच्या दि. २३.०३.२००९ च्या अधिसूचनेप्रमाणे रु. ५,००,०००/-, किंवा वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे |
| ३ | वार्षिक परवाना शुल्क | |
| | (एक) पारेषण परवाना शुल्क | खालील तक्त्यात दाखविल्या प्रमाणे, परवानाधारकाच्या व्होल्टेज –निहाय जाळयावर आणि रुपये प्रति सर्किट किलोमीटर ज्या व्होल्टेज लेव्हलला अनुरुप असेल-त्यावर आधारित केलेल्या परिगणनेप्रमाणे (जवळच्या १०० रुपयांत पूर्ण करण्यात येईल) - किमान रुपये २,००,०००/- आणि कमाल रु. २०,००,०००/- च्या अधीन राहून |

<table>
<tr><td></td><td></td><td><table><tr><td>अनु. क्र.</td><td>तपशील</td><td>शुल्क (प्रति सर्किट किलोमीटर)</td></tr><tr><td>१</td><td>एचव्हीडीसी</td><td>रु. १२,०००</td></tr><tr><td>२</td><td>७६५ केव्ही</td><td>रु. ७,०००</td></tr><tr><td>३</td><td>४०० केव्ही आणि त्या खालील</td><td>रु. ३,०००</td></tr></table></td></tr>
<tr><td></td><td>(दोन) वितरण परवाना शुल्क</td><td>वहन आणि विजेच्या विक्रीतून, कर आणि शुल्क (डयूटीज) वगळून, मिळणा-या महसूलाच्या ०.०२ टक्के (जवळच्या १०० रुपयांत पूर्ण करण्यात येईल) किमान रु. २,००,०००/- च्या अधीन राहून.</td></tr>
<tr><td></td><td>(तीन) वीज व्यापार परवाना शुल्क</td><td>विजेच्या विक्रीतून, कर आणि शुल्क (डयूटीज) वगळून, मिळणा-या महसूलाच्या ०.०२ टक्के (जवळच्या १०० रुपयांत पूर्ण करण्यात येईल) किमान रु. २,००,०००/- आणि कमाल रु. ५,००,०००/- च्या अधीन राहून</td></tr>
<tr><td></td><td>परंतु असे की,<br>अ)परवानाधारकाकडून, ज्यामध्ये अधिनियमाच्या कलम १४ मधील पहिल्या, दुस-या, तिस-या, चवथ्या व पाचव्या परंतुकामध्ये उल्लेखलेल्या परवानाधारक समाविष्ट असतील, वार्षिक परवाना शुल्क, प्रत्येक वर्षी १० एप्रिल पर्यंत आगाऊ प्रदान करण्यात येईल.<br><br>ब) परवाना शुल्क भरणात विलंब झाल्यास, परवानाधारक शिल्लक रकमेवर दर महा १.२५ टक्के दराने सरळ व्याज भरण्यास जबाबदार राहील.<br><br>क) पारेषण परवानाधारकाच्या बाबतीत,</td><td></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | राज्य पारेषण कंपनीने प्रमाणित केल्याप्रमाणे मागील आर्थिक वर्षाच्या आधीच्या आर्थिक वर्षाच्या अखेरीस अस्तित्वात असलेल्या पारेषण वाहिनीच्या सर्किट किलोमीटर्सच्या आधारे, वार्षिक परवाना शुल्काची परिगणना करण्यात येईल;<br>ड) वितरण परवानाधारकाच्या बाबतीत, मागील आर्थिक वर्षाच्या आधीच्या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षित लेख्यामध्ये दाखविलेल्या विजेच्या वहनातून आणि विक्रीतून मिळणा-या महसुलावर वार्षिक परवाना शुल्काची परिगणना करण्यात येईल;<br>इ) वीज व्यापार परवानाधारकाच्या बाबतीत, मागील आर्थिक वर्षाच्या आधीच्या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षित लेख्यामध्ये दाखविलेल्या विजेच्या विक्रीतून मिळणा-या महसुलावर वार्षिक परवाना शुल्काची परिगणना करण्यात येईल;<br>फ) ज्या परवानाधारकाला अधिनियमाच्या कलम १४ अंतर्गत प्रथमच नवीन परवाना क्षेत्रासाठी परवाना मंजूर करण्यात आला असेल तर त्याला, असा परवाना मंजूर करण्यात आल्यानंतरच्या पुढील दोन आर्थिक वर्षांसाठी वार्षिक परवाना शुल्क रु. २,००,०००/- भरावे लागेल,<br>ग) उपरोक्त (फ) येथे नमूद केलेला परंतुक फक्त नवीन परवानाधारकाला लागू राहील आणि त्याच परवाना क्षेत्राकरीता अधिनियमाच्या कलम १४ खाली परवाना मागणा-या विद्यमान परवानाधारकाला लागू असणार नाही. | |
| | | |

| | | |
|---|---|---|
| ४ | अधिनियमाच्या कलम १७ खाली पूर्व-मंजूरीसाठीचा अर्ज | ज्या व्यवहाराकरीता मंजूरी मागण्यात आली आहे त्याच्या मूल्याच्या ०.०१ टक्के, किमान रु. २,००,०००/- आणि कमाल रु. ५,००,०००/- च्या अधीन राहून |
| ५ | अधिनियमाच्या कलम १८ अंतर्गत परवान्यात सुधारणा करण्यासाठीचा अर्ज<br>(एक) परवानाधारकाने केलेला अर्ज<br>(दोन) परवानाधारका व्यतिरिक्त अन्य व्यक्तीने केलेला अर्ज | (१) रु. १,००,००० /-<br>(२) रु. १०,००० /- |
| ६ | अ) अधिनियमाच्या कलम १९ च्या उप-कलम (२) अंतर्गत पारेषण किंवा वितरण परवाना रद्द करण्यासाठी अर्ज<br>(एक) पारेषण किंवा वितरण परवानाधारकाने केलेला अर्ज<br>(दोन) पारेषण किंवा वितरण परवानाधारका व्यतिरिक्त अन्य व्यक्तीने केलेला अर्ज | (१) रु. १०,००,००० /-<br>(२) रु. १,००,००० /- |
| | ब) अधिनियमाच्या कलम १९ च्या उप-कलम (२) अंतर्गत वीज व्यापार परवाना रद्द करण्यासाठी अर्ज<br>(एक) वीज व्यापार परवानाधारकाने केलेला अर्ज<br>(दोन) वीज व्यापार परवानाधारका व्यतिरिक्त अन्य व्यक्तीने केलेला अर्ज | (१) रु. २५,००० /-<br>(२) रु. १०,००० /- |
| ७ | खालील बाबींसाठी बहु-वर्षीय वीज दर निश्चितीकरणासाठी अर्ज (भांडवली खर्चास मंजूरीसह): | |
| | अ) कलम ६२ च्या उप-कलम (१) च्या खंड (ए) अंतर्गत वीज निर्मितीसाठी, पारंपारिक इंधनावर (कोळसा, ऑइल, गॅस इ.) आधारित वीज निर्मिती प्रकल्प, जल विद्युत प्रकल्प (२५ मेवॉ वरील) | २५० मेवॉ क्षमतेपर्यंत रु. १०,००,०००/- आणि प्रत्येक अतिरिक्त १०० मेवॉ क्षमतेकरीता किंवा त्याच्या भागाकरीता रु. १,००,०००/- (जवळच्या १०० रुपयांत पूर्ण करण्यात येईल) कमाल रु. २०,००,०००/- च्या अधीन राहून |

| | | |
|---|---|---|
| | (ब) कलम ६२ च्या उप-कलम (१) च्या खंड (बी) अंतर्गत विजेच्या पारेषणासाठी | रु. १५,००,०००/- |
| | (क)<br>(एक) कलम ६२ च्या उप-कलम १ च्या खंड (सी) अंतर्गत विजेच्या वहनासाठी; आणि / किंवा<br>(दोन) कलम ६२ च्या उप-कलम १ च्या खंड (डी) अंतर्गत विजेच्या विक्रीसाठी, | वितरण परवानाधारकाकरीता रु. १५,००,०००/-<br>आणि<br>लघु वितरण परवानाधारकरीता रु. ५,००,०००/- |
| | परंतु असे की, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाने अशा दर निश्चितीकरणासाठी अर्ज केला असला किंवा आयोगाने स्वतः पुढाकार घेऊन असा दर निश्चित केला तरी निर्मिती कंपनीला किवा परवानाधारकाला हे शुल्क भरावे लागेल. | |
| ८ | पारंपारिक इंधनावर आधारित (कोळसा, ऑइल, गॅस इ.) निर्मिती प्रकल्प, जल विद्युत प्रकल्प (२५ मेवॉ वरील) किंवा परवानाधारकाने बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटी अंतर्गत नियंत्रण कालावधीतील मध्यावधी आढाव्यासाठी केलेला अर्ज | मूळ वीज दराच्या निश्चितीकरणासाठी या विनियमामध्ये विर्निदिष्ट करण्यात आलेल्या शुल्काच्या ५० टक्के (जवळच्या १०० रुपयांत पूर्ण करण्यात येईल) |
| | परंतु असे की, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाने अशा आढाव्यासाठी अर्ज केला असला किंवा आयोगाने स्वतः पुढाकार घेऊन आढावा घेतला असला तरी निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाला हे शुल्क भरावे लागेल.<br><br>परंतु आणखी असे की, बहु-वर्षीय वीज दर निश्चितीकरण्यासाठी किंवा मध्यावधी आढाव्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही वीज दराच्या अर्जाकरीता, मूळ वीज दराच्या निश्चितीकरणासाठी या विनियमामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शुल्काच्या ५० टक्के शुल्क भरावे लागेल. | |
| ९ | महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने शुल्क व आकार निश्चितकरणासाठी केलेला अर्ज, | रु. ५,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | परंतु असे की, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने शुल्क व आकारांच्या निश्चितीकरणासाठी अर्ज केला असला किंवा आयोगाने स्वतः पुढाकार घेऊन असे आकार निश्चित केले असले तरी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला हे शुल्क भरावे लागेल. | |
| १० | बहू-वर्षीय वीज दर चौकटी अंतर्गत महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने नियंत्रण कालावधीत मध्यावधी आढाव्यासाठी केलेला अर्ज<br><br>परंतु असे की, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने अशा आढाव्यासाठी अर्ज केला असला किंवा आयोगाने स्वतः पुढाकार घेऊन आढावा घेतला असला तरी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला हे शुल्क भरावे लागेल. | मूळ वीज दराच्या निश्चितीकरणासाठी या विनियमामध्ये विर्निदिष्ट करण्यात आलेल्या शुल्काच्या ५० टक्के (जवळच्या १०० रुपयांत पूर्ण करण्यात येईल) |
| ११ | अ-पारंपारिक किंवा नूतनशील ऊर्जा प्रकल्प, सह निर्मिती प्रकल्पांसह अधिनियमाच्या कलम ६२ च्या उप-कलम १ च्या खंड (ए) अंतर्गत वीज दर निश्चित करण्यासाठी केलेला अर्ज | ५ मेवॅ क्षमतेपर्यंत रु. १,००,०००/-; आणि प्रत्येक अतिरिक्त ५ मेवॅ क्षमतेसाठी किंवा त्याच्या भागासाठी रु. ५,०००/- (जवळच्या १०० रुपयांत पूर्ण करण्यात येईल) - कमाल रु. ५,००,०००/- च्या अधीन राहून |
| १२ | अधिनियमाच्या कलम ८६ च्या उप-कलम (१) च्या खंड (बी) अंतर्गत वीज खरेदी करारास मान्यता देण्यासाठी आणि / किंवा अधिनियमाच्या कलम ६३ अंतर्गत वीज दर स्वीकृत करण्यासाठी करण्यात आलेला अर्जः | |
| | (अ) पारंपारिक इंधनावर आधारित (कोळसा, गॅस, ऑइल, इ.) निर्मिती प्रकल्प, जल-विद्युत प्रकल्प (२५ मेवॅ वरील) ने केलेला अर्ज | रु. ३,००,०००/- |
| | (ब) अ-पारंपारिक किंवा नूतनशील ऊर्जा प्रकल्प, सह-निर्मिती प्रकल्पांनी देखील केलेला अर्ज - | रु. ५०,०००/- |
| १३ | (अ) वीज दराचा आदेश किंवा वीज खरेदी करार किंवा वीज प्राप्त करुन घेण्याच्या दराचा | |

| | | |
|---|---|---|
| | आढावा घेण्यासाठी अर्जः | |
| | (एक) परवानाधारकाने किंवा निर्मिती कंपनीने केलेला अर्ज | (एक) मूळ वीज दराच्या निश्चितीकरणासाठी या विनियमामध्ये विर्निदिष्ट करण्यात आलेल्या शुल्काच्या १० टक्के (जवळच्या १०० रुपयांत पूर्ण करण्यात येईल) |
| | (दोन) ग्राहकाने अथवा ग्राहक प्रतिनिधीने अर्ज केलेला अर्ज | (दोन) रु. २५,०००/- |
| | (तीन) परवानाधारक, निर्मिती कंपनी, ग्राहक किंवा ग्राहक प्रतिनिधी व्यतिरिक्त अन्य व्यक्तीने केलेला अर्ज | (तीन) रु. १,००,०००/- |
| | (ब) अधिनियमाच्या तरतुदींतर्गत वादावर देण्यात आलेल्या अभिनिर्णयावरील आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी अर्ज | (एक) मूळ अर्जासाठी या विनियमामध्ये विर्निदिष्ट करण्यात आलेल्या शुल्काच्या १० टक्के (जवळच्या १०० रुपयांत पूर्ण करण्यात येईल) |
| १४ | अधिनियमाच्या कलम ४५ आणि कलम ४६ अंतर्गत वितरण परवानाधारकाने आकारांच्या अनुसूचीला मान्यता मागण्यासाठी केलेला अर्जः<br><br>परंतु असे की, परवानाधारकाने त्याच्या वीज दराच्या याचिकेचा एक भाग म्हणून जर आकारांच्या अनुसूचीला मान्यता मिळण्यासाठी अर्ज केला असेल तर, असे वेगळे शुल्क भरावे लागणार नाही | वितरण परवानाधारकाकरीता रु. ५,००,०००/-<br>आणि<br>लघु वितरण परवानाधाकरीता रु. २,००,०००/- |
| १५ | आयोगाचे आदेश/ अभिलेखे तपासणीसाठी अर्ज | वेळोवेळी सुधारणा केलेल्या माहीतीचा अधिकार (शुल्क व खर्चाचे विनियमन) नियम, २००५ मध्ये विहित करण्यात आल्या प्रमाणे |
| १६ | आयोगाचे दस्तावेज/आदेश/विनियमांच्या डिजिटल / छापील प्रती पुरविण्यासाठी अर्ज | वेळोवेळी सुधारणा केलेल्या माहीतीचा अधिकार (शुल्क व खर्चाचे विनियमन) नियम, २००५ मध्ये विहित करण्यात आल्या प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| १७ | या विनियमात अन्यत्र समाविष्ट नसलेल्या आयोगाच्या आदेशाचे पुनर्विलोकन करण्यासाठी अर्ज | रु. १०,०००/- |
| १८ | संकीर्ण अर्ज म्हणजेच या विनियमामध्ये अन्यत्र समाविष्ट नसलेले अर्जः<br>(एक) परवानाधारकाने केलेला अर्जः<br>(दोन) व्यक्ती वगळून इतरांनी (एंटीटी) केलेला अर्ज; आणि<br>(तीन) व्यक्तीने केलेला अर्ज | <br><br>(एक) रु. १०,०००/-<br>(दोन) रु. १,०००/-<br><br>(तीन) रु. ५००/- |
| १९ | संकीर्ण अर्ज या वर्गवारीत न येणारा महाराष्ट्र शासनाकडून आलेला अर्ज | रु. १,०००/- |

अश्वनी कुमार सिन्हा
सचिव,
म्हाराषःट्र विद्युत नियामक आयोग

दिनांक : मार्च , २०१७
ठिकाण : मुंबई